गांधी एज्युकेशन सोसायटी,कुंडलचे

# क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय,कुंडल

## महाविद्यालय वर्धापनदिन समारंभ २०२३ – २०२४

### अहवाल

गुरूवार दि. १३ जुलै २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये महाविद्यालयाचा वर्धापन दिन समारंभ मोठ्या उत्साहात संपन्न झाला. समारंभाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील (आबा ) यांनी भूषवले. मा. आमदार अरुणअण्णा लाड (प्रमुख, क्रांती उद्योग आणि शिक्षण समूह ) हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर समारंभास संस्थेचे समन्वय समितीचे सचिव मा. किरणतात्या लाड ( अध्यक्ष क्रांती दूध संघ ), संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. चंद्रकांत रोकडे, सचिव मा. प्रकाशभाऊ लाड, खजिनदार मा. गोविंदराव डुबल, सुपरिटेडेंट मा. एस. डी. लाड तसेच संस्थेचे संचालक डॉ. व्ही. डी. पाटील, एम. टी. हुबाले, शिवाजी गावडे, दिलीप लाड, अशोक लाड, ग्रामीण कथाकार जयवंत आवटे, संवाद मंचचे अध्यक्ष अशोक पवार, प्रतिनिधी हायस्कूलचे मुख्याध्यापक मा. चंद्रकांत जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्यने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड व विजयाकाकू लाड यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. आर. एस.डुबल कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी उपस्थित मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सदर कार्यक्रमात महाविद्यालयाच्या 'प्रतिबिंब' या वार्षिक अंकाचे प्रकाशन करण्यात आले. समारंभाचे प्रमुख पाहुणे मा. आमदार अरुणअण्णा लाड यांनी शैक्षणिक धोरणाचा सर्वात जास्त फटका ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषता मुलींना बसणार असल्याने ग्रामीण भागातील मुला, मुलींसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्द्ध करुन देण्यासाठी एकत्रीत प्रयत्नांची गरज आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. विद्यार्थी, पालक आकर्षित होण्यासाठी पायुभूत सुविधाबरोबरच उच्च दर्जाचे शिक्षण देणे गरजेचे असून कोणतीही गोष्ट मिळविणे सोपे असते, मात्र ते टिकवणे अवघड असल्याने सर्वांनी कोणतीही गोष्ट मिळविण्यासाठी जेवढे प्रयत्न करतो तेवढेच कष्ट ते टीकविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले.

किरणतात्या लाड यांनी पुढीलप्रमाणे मनोगत व्यक्त केले, जगाच्या स्पर्धेत ग्रामीण भागातील मुले टीकली पाहिजेत यासाठी पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्द्ध करुन देण्याच्या उद्देशाने स्व. क्रांतीअग्रणी जी. डी. बापूंच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय सुरु केले. प्रारंभी फक्त कला शाखेवर सुरु झालेल्या महाविद्यालयात आज वाणिज्य, बी. सी. ए. याबरोबरच सायन्स हे विभागही सुरु झाले आहेत.

अध्यक्षीय भाषणात मा. व्ही. वाय. पाटील (आबा ) यांनी स्पर्धेच्या जगात जगायच अन टिकायचे असेल तर नवनविन कौशल्य संपादन केले पाहिजे याची जाणिव आजच्या युवा पिढीला झाल्याने अलीकडील स्पर्धा परीक्षेमध्ये ग्रामिण मुले ही यशस्वी होत असलेचे आशादायी चित्र असल्याचे स्पष्ट केले. माजी प्राचार्य प्रा. डॉ. प्रताप लाड यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयाच्या उभारणीपासून च्या गत आठवणींना उजाळा दिला. सुत्रसंचलन प्रा. डॉ. धनंजय होनमाने यांनी तर आभार प्रा. डॉ. नवनाथ गुंड यांनी मानले.

सांस्कृतिक विभाग प्रमुख

प्राचार्य

Krantiagrani Dr.G.D.Bapu Lad Mahavidyalaya, Kundal.

**Principal**
**Krantiagrani G.D.Bapu Lad Mahavidayalaya,Kundal.**